क्र. १४८ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

११ जून २०२३

## येशूच्या अति पवित्र शरीर व रक्ताचा सोहळा

### प्रस्तावना

''जो माझा देह खातो व माझे रक्त पितो तो मजमध्ये व मी त्याच्यामध्ये राहतो.'' प्रभू येशू ख्रिस्ताने क्रूसावरील समर्पणाद्वारे स्वत:चे रक्त सांडून मानव व देव ह्यांच्यामध्ये नवीन कराराची स्थापना केली. प्रभू येशू स्वत: जीवनाची भाकर होऊन आपली आध्यात्मिक भूक व तहान भागविण्यास ह्या जगात आला. ख्रिस्ताला आपल्या प्रत्येकाबद्दल प्रेम, जिव्हाळा व चिंता आहे म्हणून त्याने आजाऱ्यांना बरे केले. निराधारांना जवळ केले. दु:खी, पीडितांचे अश्रू पुसले व भुकेलेल्यांना अन्न पुरविले.

जीवनाची जिवंत भाकर असलेल्या ख्रिस्ताच्या शरीराचे व रक्ताचे सेवन केल्यावरच आपल्याला अशांतीच्या जगात खरी शांती व समाधान प्राप्त होते. जगण्याची भीती वाटायला लागल्यावर हीच भाकर आपल्याला दिलासा देते, बळ देते. ख्रिस्तशरीर श्रद्धेचे रहस्य आहे. ख्रिस्तप्रसादाने आपण ख्रिस्ताशी एकरूप होतो. ख्रिस्त आपल्या जीवनात सदैव राहावा म्हणून आपण ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, येशू ख्रिस्ता तुझ्या यातनेची व मृत्यूची स्मृती म्हणून हा ख्रिस्तप्रसाद तू आम्हाला दिला आहेस. तुझ्या शरीराच्या व रक्ताच्या संस्काराची आम्ही मन:पूर्वक उपासना करीत आहोत. या उपासनेमुळे तू आम्हासाठी जिंकलेल्या तारणाचा व स्वर्गीय शांतीचा अनुभव आम्हाला येऊ दे. तू पिता व पवित्र आत्मा ह्यांच्याबरोबर एकच परमेश्वर असून, सर्वकाळ जिवंत राहतोस व राज्य करतोस.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**अनुवाद या पुस्तकातून घेतलेले वाचन ८:२-३, १४-१६**

**''देवाने तुम्हांला किंवा तुमच्या पूर्वजांना माहीत नसलेला मान्ना खाऊ घालून तुमचे पोषन केले.''**

मोशे लोकांना म्हणाला, ''तुम्हांला लीन करावे आणि तुमच्या मनात काय आहे म्हणजे तुम्ही त्याच्या आज्ञा पाळणार की नाही ह्याची कसोटी पहावी म्हणून तुमचा देव परमेश्वर ह्याने चाळीस वर्षे तुम्हाला उजाड रानातून कोणत्या रीतीने चालवले ह्याचे स्मरण करा. मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल ह्याची जाणीव तुम्हांला व्हावी म्हणून त्याने तुम्हाला लीन केले, तुमची उपासमार होऊ दिली आणि तुमच्या पूर्वजांनाही माहीत नसलेला मान्ना खाऊ घालून तुमचे पोषण केले.

''तुमचे मन उन्मत होऊ नये आणि तुमचा देव परमेश्वर ज्याने तुम्हांला मिसर देशातून, दास्यगृहातून काढून आणले त्याला तुम्ही विसरू नये म्हणून सांभाळा. आग्या सापांनी व विंचवांनी व्यापलेल्या घोर व भयानक रानातून आणि रुक्ष व निर्जल भूमीतून त्याने तुम्हांला आणले, त्याने तुमच्यासाठी गारेच्या खडकातून पाणी काढले आणि उजाड रानात तुमच्या पूर्वजांना माहीत नसलेला मान्ना खाऊ घालून त्याने तुमचे पोषण केले.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१४७:१२-१३, १४-१५,१९-२०**

प्रतिसाद : **हे यरुशलेम, परमेश्वराचा गौरव कर.**

१. हे यरुशलेम, परमेश्वराचा गौरव कर, हे सियोन, तू आपल्या देवाचे स्तवन कर. त्याने तुझ्या वेशीचे अडसर बळकट केले आहेत, त्याने तुझ्याठायी मुलांना आशीर्वाद दिला आहे.

२. तो तुझ्या सिमांच्या आत शांतता पसरितो, उत्कृष्ट गव्हाने तुला तृप्त करतो. तो आपली आज्ञा पृथ्वीवर पाठवतो, त्याचा शब्द फार वेगाने धावतो.

३. याकोबला आपले वतन, इस्राएलला आपले नियम आणि निर्णय जाहीर करतो. कोणत्याही राष्ट्रांबरोबर त्याने असे वर्तन केले नाही, त्याचे निर्णय तो जाणत नाहीत. परमेश्वराचे स्तवन करा.

### दुसरे वाचन

**पौलचे करिंथकरांस पहिले पत्र यातून घेतलेले वाचन १०:१६-१७**

**''आपण पुष्कळजण असूनही एक भाकर, एक शरीर, असे आहोत.''**

मी आशीर्वादाचा प्याला आपण आशीर्वादित करतो तो ख्रिस्ताच्या रक्ताच्या सहभागितेचा प्याला आहे की नाही? जी भाकर आपण मोडतो ती ख्रिस्ताच्या शरीराच्या सहभागितेची भाकर आहे की नाही? आपण सर्व एका भाकरीचे भागीदार आहोत म्हणून आपण पुष्कळजण असून एक भाकर, एक शरीर, असे आहोत.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान ६:५१**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभू म्हणतो, स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर मीच आहे, या भाकरीतून जो कोणी खाईल तो सर्वकाळ जगेल.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ६:५१-५८**

**''माझा देह खरे खाद्य आणि माझे रक्त खरे पेय आहे.''**

येशू यहुद्यांस म्हणाला, ''स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर मीच आहे. ह्या भाकरीतून जो कोणी खाईल तो सर्वकाळ जगेल. जी भाकर मी देईन ती माझा देह असून ती जगाच्या जीवनासाठी आहे.''

तेव्हा यहुदी आपसामध्ये वितंडवाद करू लागले आणि म्हणाले, ''हा आपला देह आम्हांला खायला कसा देऊ शकतो?'' तुम्ही मनुष्याच्या पुत्राचा देह खाल्ला नाही आणि त्याचे रक्त प्याला नाही तर तुम्हामध्ये जीवन नाही. जो माझा देह खातो आणि माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे आणि मीच त्याला शेवटल्या दिवशी उठवीन. कारण माझा देह खरे खाद्य आणि माझे रक्त खरे पेय आहे. जो माझा देह खातो आणि माझे रक्त पितो तो माझ्यामध्ये राहतो आणि मी त्याच्यामध्ये राहतो. जसे जिवंत पित्याने मला पाठवले आणि जसा पित्यामुळे मी जगतो, तसे जो मला खातो तोही माझ्यामुळे जगेल. स्वर्गातून उतरलेली भाकर मीच आहे, तुमच्या पूर्वजांनी भाकर खाल्ली तरी ते मेले. हे तसे नाही, ही भाकर जो खातो तो सर्वकाळ जगेल.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

आपला प्रतिसाद असेल – **हे परमेश्वरा, दया कर, आणि आमच्या लोकांची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची समर्थपणे धुरा सांभाळणाऱ्या धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधूंना परमेश्वराच्या दयेचा, प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. आपल्या कुटुंबात, गावामध्ये, समाजामध्ये शांती, प्रेम व ऐक्य सतत नांदत राहावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. आपल्या प्रत्येकाच्या नोकरीधंद्यावर व शेतीवाडीतील कामावर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा व आमचे जीवन बहरावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. आपल्या युवक मित्रमंडळीला वेगवेगळ्या ऐहिक मोहपाशांशी मुकाबला करावा लागत आहे. त्या अग्निदिव्यातून जात असताना युवक-युवतींनी आपल्यामधील विकारांच्या अंधारावर मात करून विवेकबुद्धीच्या प्रकाशात मार्गक्रमण करीत राहावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण प्रार्थना करूया

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणीवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, ऐक्याचे व शांतीचे प्रतीक म्हणून भाकर व द्राक्षरस आम्ही तुला अर्पण करीत आहोत. या समर्पणामुळे ख्रिस्तसभेला ऐक्याचे व शांतीचे वरदान मिळो. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, येशू ख्रिस्ता, तुझ्या दैवी जीवनात आम्ही आतादेखील सहभागी होऊ शकतो. याची खूण म्हणून ख्रिस्तप्रसादाद्वारे तू आम्हाला तुझे शरीर व रक्त सेवन करावयास देतोस. तुझ्या स्वर्गराज्यात तुझ्या दैवी जीवनात पूर्णपणे सहभागी होण्याचे भाग्य आम्हाला मिळू दे. तू सर्वकाळ जिवंत राहतोस व राज्य करतोस.

## चिंतन

परमेश्वर मानवाशी विविध मार्गांनी संपर्क साधत असतो. प्रभू येशू ख्रिस्ताच्या अतिपवित्र शरीराचा आणि अतिमौल्यवान रक्ताचा सोहळा आपल्यासमोर एकूण तीन मार्ग सादर करतो.

**अ) दररोजची भाकर पुरवून परमेश्वर आपली शारीरिक गरज भागवितो :** अरण्यात आपल्यावर भुकेकंगाल होण्याची पाळी आलेली आहे अशी तक्रार इस्राएली लोकांनी मोशेकडे केली. आजच्या पहिल्या वाचनात (अनुवाद ८:२-३, १४ब-१६अ परमेश्वर त्यांची शारीरिक गरज भागविण्यासाठी मान्ना कसे पाठवतो त्याचे वर्णन ऐकायला मिळते. त्यामुळे अन्नदाता परमेश्वराच्याजवळ जाण्याऐवजी केवळ हव्यासापोटी इस्राएली लोकांनी देवाविरुध्द बंड पुकारले.

**ब) ख्रिस्ताच्या शरीर व रक्ताने परमेश्वर ख्रिस्तसभेचे आध्यात्मिक पोषण करतो :** आजच्या दुसऱ्या वाचनात (१ करिंथ. १०:१६-१७) संत पौल ख्रिस्तसभेच्या आध्यात्मिक पोषणावर प्रकाश टाकतो. ग्रीक भाषेतील ''कोयनोनिया'' हा शब्द सहभागिता, ऐक्य, घनिष्ठ नातेसंबंध सूचित करतो. आपले सामुदायिक जीवन समृध्द व धार्मिक ऐक्य दृढ करायचे असेल तर ख्रिस्ती व्यक्तींनी वारंवार ख्रिस्तशरीराचा स्वीकार करायला हवा असे पौल सुचवितो.

**क) स्वर्गीय अन्नाने परमेश्वर आपल्या आत्म्याची भूक भागवितो :** जुन्या करारातील मान्ना हे परमेश्वराच्या ऐश्वर्यसंपन्नतेचे आणि उदारतेचे प्रतीक होते. स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर असलेला प्रभू येशू ख्रिस्त साक्षात् परमेश्वराचे परिपूर्ण प्रकटीकरण होय. आजच्या शुभवर्तमानात (योहान ६:५१-५८) आत्म्याचे अन्न स्वीकारणारी श्रध्दाळू व्यक्ती येशूशी कशी एकरूप होते, आणि सार्वकालिक जीवनास कशी पात्र ठरते त्याविषयी येशू स्पष्टीकरण करतो. केवळ भौतिक गरजा भागविणारी जागतिक मनोवृत्तीची जीवनशैली मानवाची आत्मिक भूक शमवू शकत नाही हे तो सूचित करतो.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात कोणकोणत्या बाबतीत भौतिक गरजांपेक्षा आध्यात्मिक भूक भागविण्याची गरज आहे असे मला वाटते?

●●●

| जून २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १२ | शहागुनचा सं जॉन (हि) | : २ करिंथ. १:१-७/मत्तय ५: १-१२ |
| मंगळ १३ | पादुआचा सं अंतोनी (पां) | : २ करिंथ. १:१८-२२/मत्तय ५:१३-१६ |
| बुध १४ | सं मेथोडिअस (हि) | : २ करिंथ. ३:४-११/मत्तय ५:१७-१९ |
| गुरू १५ | सं जर्मेन कझीन (हि) | : २ करिंथ.३:१५-४:६/मत्तय ५:२०-२६ |
| शुक्र १६ | येशूच्या पवित्र हृदयाचा सोहळा (पां) | : अनुवाद ७:६-११/१ योहान ४:७-१६/मत्तय ११:२५-३० |
| शनि १७ | सं जोकिम (पां) | : २ करिंथ. ५:१४-२१/मत्तय ५:३३-३७ |